**जिल्हा परिषदेच्या अंतर्गत कर्मचा-यांनी मुख्यालयी रहाण्याच्या दृष्टीने आवश्यक सुचना**

**जिल्हा परिषद औरंगाबाद**
**सामान्य प्रशासन विभाग**
**परिपत्रक क्रमांक जिपऔ/साप्रवि-3/कावी/2021/ 1116/4416**
**दिनांक 08.12.2021**

वाचा:-1.शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपुर-1287/643/सेवा-10,दिनांक 25.04.1988
2.शासन निर्णय क्रमांक घभाभ-1089/प्र.क्र.10/सेवा-5,दिनांक 05.02.1990
3.ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक अराप/2008/प्र.क्र.232/आस्था-9,दिनांक 05.07.2008
4.ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक अराप/2008/प्र.क्र.232/आस्था-9,दिनांक 03.11.2008
5.वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक घभाभ 1015/प्र.क्र.01/सेवा 5,दिनांक 07.10.2016
6.शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2018/प्र.क्र.488/आस्था-7,दिनांक 09.09.2019

**प्रस्तावना:-**

केंद्र शासन व राज्य शासनाच्या अधिनस्थ विविध विभागांच्या योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येते.सदर योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी क्षेत्रीय स्तरावर जिल्हा परिषदेच्या अधिनस्थ गट "क" आणि गट "ड" च्या कर्मचा-यांवर असते.योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी करीता सर्व कार्यालयातील कर्मचा-यांनी मुख्यालयी वास्तव्य करुन राहणे आवश्यक असले तरी असे कर्मचारी मुख्यालयी वास्तव्य करुन राहत नसले बाबत वारंवार प्राप्त होणा-या तक्रारी विचारात घेऊन खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासनाचे संदर्भ क्र 01 ते 05 च्या शासन निर्णय/शासन परिपत्रकातील सुचना विचारात घेऊन संदर्भ क्र 06 अन्वये जिल्हा परिषद अंतर्गत कर्मचा-यांनी मुख्यालयी राहण्याच्या दृष्टीने आवश्यक सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.सदरील सुचनांमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्यामुळे आता खालील प्रमाणे सुचना निर्गमीत करण्यात येत आहेत.

1. प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ग्राम विकास अधिकारी, आरोग्य सेवक व आरोग्य सहाय्यक मुख्यालयी राहत असल्यासंबंधी संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा ठराव प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे.

2. कार्यालय प्रमुखानी आपले अधिनस्थ कर्मचारी मुख्यालयी वास्तव्य राहत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.



Scanned with CamScanner

3.मुख्यालयी वास्तव्य करुन राहणारे कर्मचारी शासकीय निवासस्थानात वास्तव्य करीत असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखांनी त्याबाबत प्रमाणित करणे आवश्यक राहील आणि जे कर्मचारी शासकीय निवासस्थानात राहत नसतील त्यांचे बाबतीत भाडेकरार केल्याचे दस्तावेज मागवून घ्यावेत.

4.मुख्यालयात न राहणा-या कर्मचा-यांबाबत पडताळणीअंती खात्री झाल्यास अशा प्रकरणी शिस्तभंग विषयक प्रधिकरणाने संबधित कर्मचा-यांबाबत पाहिल्यांदा अशी बाब घडल्याचे, निदर्शनास आल्यास त्याबाबत एक वेतनवाढ 3 वर्षासाठी स्थगित करण्याची किरकोळ शिक्षा लादावी.

5.पडताळणीअंती दुस-यांदा अशी बाब घडल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कर्मचा-याविरुध्द गंभीर शिक्षा लादण्यासाठी प्रक्रिया तातडीने पार पाडण्याचे निर्देश विभाग प्रमुखांना देण्यात येत आहेत.

6.यासंदर्भात बायोमेट्रीक हजेरी आणि तपासणी पथकांमार्फत आकस्मिक पडताळणी या बाबतचे आदेश विभागप्रमुखांनी निर्गमीत करावेत, आणि त्याद्वारे कर्मचा-यांच्या मुख्यालयातील वास्तव्याची पडताळणी करावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता सर्व विभागप्रमुख आणि गट स्तरावरील खाते प्रमुखांनी त्यांच्या अधिनस्थ कर्मचारी मुख्यालयी राहणेकरीता उपरोक्त वाचा मधील 1 ते 6 अन्वये निर्देशीत केलेल्या ठोस उपाययोजना कराव्यात आणि जे कर्मचारी मुख्यालयी वास्तव्य करुन राहणार नाहीत, त्यांच्या विरुध्द उपरोक्त कार्यवाही पुर्ण झाल्याशिवाय संबंधितांचे जानेवारी 2022 चे वेतन अदा करु नये.

वरील परिपत्रकातील तरतुदी सर्व संबधितांच्या निदर्शनास आणाव्यात,आणि परिपत्रक जि.प.च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

( नीलेश र. गटणे) भाप्रसे
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद औरंगाबाद
8.12

प्रत:-
1.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद
2.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,औरंगाबाद
3.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद
4.सर्व खाते प्रमुख, जिल्हा परिषद,औरंगाबाद
5.सर्व गट विकास अधिकारी,पंचायत समिती जिल्हा औरंगाबाद
मार्फत पंचायत समिती
6.सर्व तालुकास्तरीय कार्यालय प्रमुख(उप विभाग,एबाविसेयो,तालुका आरोग्य,पविअ कार्यालय)
7.सर्व ग्रामस्तरावरील कार्यालय प्रमुख (ग्रामपंचायत,प्रशाला,प्रा.आ.केंद्र,पशु.वै.दावाखाना,प्राथ.शाळा)



Scanned with CamScanner